# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E.Mail - pilcbnskr@gmail.com**


---

## प्रेसनोट

दिनांक:- १५/१०/२०१८

## धोंडगव्हाणवाडी, ता.चांदवड येथील खुनाचे गुन्हयातील आरोपी ०६ तासात जेरबंद
## वावी परिसरात महामार्गावर लुटमार करणारे टोळीतील गुन्हेगारही ताब्यात
## स्थानिक गुन्हे शाखेचे पथकांची कारवाई

---

काल दि. १४/१०/२०१८ रोजी चांदवड तालुक्यातील वडनेर भैरव हद्दीतील धोंडगव्हाणवाडी शिवारात दुर्गादेवी मंडळाचे समोर नाचण्याचे कारणावरून झालेल्या भांडणाची कुरापत काढुन दोन तरूणांनी **युवक नामे लखन अर्जुन चहाळे,** वय २०, रा. धोंडगव्हाणवाडी यास चाकुने अंगावर वार करून जिवे ठार मारले होते. सदर बाबत **वडनेर भैरव पोलीस ठाण्यात I गुन्हा रजि.नं. ९८/२०१८ भादवि कलम ३०२, ५०४, ३४** प्रमाणे तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर घटना घडलेनंतर गुन्हयातील संशयीत इसम नामे १) संदिप कांतीलाल कडाळे, व २) दिगंबर नामदेव कडाळे, दोन्ही रा. धोंडगव्हाणवाडी या दोघांनी घटनास्थळावरून पोबारा करून अज्ञातस्थळी फरार झाले होते. सदर घटनेबाबत नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री.नीलोत्पल सो.** यांनी तात्काळ दखल घेवुन सदर गुन्हयातील आरोपीस अटक करणेबाबत सुचना दिल्या. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी सदर गुन्हयात तपासाची चक्रे फिरवुन फरार आरोपीतांचे वास्तव्याबाबत गोपनीय माहिती घेतली व स्थागुशाचे पथकास पिंपळगाव बसवंत शिवारात पाचारण केले. त्याप्रमाणे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी पिंपळगाव बसवंत, उंबरखेड रोड परिसरातुन **आरोपी नामे १) संदिप कांतीलाल कडाळे,** वय २४, **२) दिगंबर नामदेव कडाळे,** वय १८, दोन्ही रा. धोंडगव्हाणवाडी, ता.चांदवड यांना ताब्यात घेतले. सदर आरोपीतांना वरील गुन्हयाचे तपासकामी वडनेर भैरव पोलीस ठाणेस हजर करण्यात आले असुन पुढील तपास चालु आहे.

तसेच गेल्या हप्त्यात दि. ०७/१०/२०१८ रोजी पहाटेचे सुमारास सिन्नर ते शिर्डी महामार्गावर वावी गावचे परिसरातील मिरगाव फाटयावर अज्ञात ०३ आरोपीतांनी पल्सर मोटरसायकलवर येवुन ट्रक ड्रायव्हर नामे राहुलकुमार दिलीपकुमार वर्मा, रा. मुलानी, ता.जि.सिहोर, राज्य मध्यप्रदेश याचे आयशर ट्रकला मोटर सायकल आडवी मारून त्याची गच्ची पकडुन खाली ओढले, व पोटावर चाकु लावुन डोक्यात दगड मारून जखमी करून खिशातील रोख रूपये व मोबाईल फोन जबरीने लुटमार करून नेले होते. सदर बाबत **वावी पोलीस ठाणेस I गु.र.नं. २११/२०१८ भादवि कलम ३९४,३२४,५०४,३४** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचे कार्यप्रणालीवरून गुन्हा करणारे आरोपी हे जिल्हयाचे सीमावर्ती भागातील असल्याचा तर्क लावुन, स्थागुशाचे पथकाने अवसारी बु।।, ता.आंबेगाव जि.पुणे येथुन संशयीत आरोपी नामे **१) कैलास रामभाउ वाल्हेकर,** वय २८, रा. रास्तपुर, ता.नेवासा, जि.अ.नगर हल्ली अवसारी बु।।, जि.पुणे यास ताब्यात घेतले. सदर आरोपीस विश्वासात घेवुन चौकशी केली असता, त्याने त्याचे साथीदार नामे **२) अनिल कैलास जाधव,** रा. ममदापुर, ता.येवला, **३) लखन तात्याराव थोरात**, रा. वारेगाव, फुलांब्री, जि.औरंगाबाद यांचेसह गेल्या हप्त्यात सिन्नर शिर्डी महामार्गावर एक ट्रक चालकास अडवुन त्याचे डोक्यात दगड मारून रोख रूपये व मोबाईल फोन जबरीने लुटमार केल्याची कबुली दिली आहे. ताब्यात घेतलेला आरोपी कैलास वाल्हेकर याचे कब्जातुन वरील गुन्हयात लुटमार करून नेलेला **सॅमसंग कंपनीचा जे-२ मोबाईल फोन हस्तगत** करण्यात आला असुन त्याचे इतर साथीदारांचा स्थागुशाचे पथक कसोशिने शोध घेत आहे. वरील आरोपी हे महामार्गावर लुटमार करणारे सराईत गुन्हेगार असुन त्यांचेकडुन अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.,** अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. नीलोत्पल सो**, अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गाकवाड सो**. यांचे मार्गदर्शनाखाली **स्थानिक** गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे,** सपोनि **श्री. आशिष अडसुळ**, सपोउनि अरूण पगारे, पोहवा प्रकाश चव्हाणके, संजय गोसावी, दिलीप घुले, पोना प्रितम लोखंडे, पोकॉ सुशांत मरकड, किरण काकड, मंगेश गोसावी, निलेश कातकाडे, हेमंत गिलबिले, संदिप लगड, प्रदिप बहिरम, गोकुळ सांगळे यांचे पथकाने वडनेर भैरव येथील खुनाचे गुन्हयातील आरोपीतांना ०६ तासाचे आत ताब्यात घेतले असुन वावी पोलीस ठाणेकडील जबरी लुटमारीचा गुन्हाही उघडकीस आणलेला आहे.